# सबकुछ ट्रेंडी, डिझाइनर !

भिंती आणि निर्मिती

● केतन गाडगीळ

'आमच्या घरातलं डायनिंग टेबल कमी उंचीचं (लो लेव्हल) जपानी स्टाइल हवं आणि बेडरूमच्या भिंती, फर्निचरचे कॉम्बिनेशन लाइट ऑरेंज किंवा पीचच्या टोन्समध्ये चालेल...' इथपासून ते 'लिव्हिंग रूमचा लुक मात्र 'पेशवाई', अगदी इंडियन टच असलेला कसा वाटेल', असे अनेक प्रश्न हल्ली ऐकायला मिळतात.

आर्थिक स्थिती उत्तम असणाऱ्यांमध्ये घराला एका विशिष्ट संकल्पनेतून, थीमचा विचार करून सजवण्याची कल्पना रुजत आहे. त्यात प्रत्येकाला आपलं घर सध्याच्या भाषेत सांगायचं झालं तर 'ट्रेंडी' किंवा 'डिझाइनर लुक' असलेलं, इतरांपेक्षा वेगळं असावं, असं वाटतं.

हातात मुबलक पैसा उपलब्ध झाल्याने अनेकजण आपल्या आवडत्या थीमवर सर्वसाधारण खर्चापेक्षा जास्त पैसे खर्च करून आपलं वेगळेपण जपत असल्याने साहजिकच इंटेरिअरवरील खर्चाचा स्तर उंचावला आहे. त्यामुळे अनेकविध प्रकारच्या इंटिरिअरसाठी लागणाऱ्या फ्लोअरच्या टाइल्सपासून ते इम्पोर्टेड कापडाच्या व्हरायटीज उपलब्ध झाल्या आहेत.



परदेश वाऱ्याही आता सहज शक्य झाल्या आहेत. त्यामुळे तिकडे बघितलेल्या सोयी, तिकडचे फर्निचरचे ताजे ट्रेंड्स इथं आपल्याकडे वापरावे याकडे कल वाढतोय.

परदेशात तिथल्या हवामानाला अनुसरून केलेलं वुडन फ्लोअरिंग आता आपल्या इथं एक वेगळा लुक देण्यासाठी फ्लॅटपासून ते मोठ्या बंगल्यांपर्यंत सर्वत्र दिसू लागलंय. रेल्वे ट्रॅकमध्ये बसवण्यात येणाऱ्या डार्क, ब्लॅकिश ब्राऊन लाकडाचा वापर अनेकजण करताना दिसतात. तुलनेने कमी खर्चातही वापरता येईल, असं लॅमिनेटेड वुडन फ्लोअरिंगही सर्रास वापरलं जाऊ लागलंय. विविध रंगांच्या शेड्समध्ये, निरनिराळ्या आकारात उपलब्ध असलेल्या चकचकीत इंपोर्टेड टाइल्स आता मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होऊ लागल्यायत.





जेवणाच्या टेबलसाठी वापरली जाणारी काच आता 'ग्लास हाऊस'चा टच देण्याच्या कल्पनेतून अनेक प्रकारात वापरली जात आहे. स्टेनलेस स्टील किंवा रॉट आयर्नच्या फर्निचरच्या कॉम्बिनेशनमध्येही काच खुलून दिसते. आधी महाग वाटावी अशी टफन्ड ग्लास/ ट्रेंडी ग्लास लुक देण्यासाठी, फ्लोअरिंगसाठी, जिन्याच्या पायऱ्यांसाठी, रेलिंगसाठी ते अगदी पार्टिशनसाठीही वेगवेगळ्या प्रकारच्या आकारात 'बेंड ग्लास'च्या रूपातही वापरली जात आहे.

प्रत्येक प्रांतातील पारंपरिक कलाकुसरीच्या शैलींचा वापर करून केलेली रचना खूप ठिकाणी दिसून येते. पण महाभारतातील मयसभेप्रमाणे स्वप्नवत वाटावी अशी रचना आपल्या घरात करणे आताच्या प्रगत तंत्रज्ञानामुळे सहज शक्य झाले आहे. बाहेरच्या वातावरणाशी अनुसरून बदल करता येऊ शकणारे लाइट इफेक्ट्स, मूड लायटिंगच्या संकल्पनेतून अनेकांच्या घरात दिसत आहेत.

घरात जेवणाच्या टेबलच्या मागे अथवा एखाद्या भिंतीऐवजी बॅकड्रॉप म्हणून केलेला वॉटर कर्टन (पाण्याचा पडदा) किंवा आपण पाण्यावर चालत आहोत, बसलो आहोत असं वाटावं, अशी रचना अनेकांना मोहात पाडू लागलीय.

एअर कंडिशनिंग युनिट्स तुलनेने स्वस्त झालेली असल्यामुळे धुळीपासून मुक्त, स्वच्छ, टापटिप घरं, मेंटेनन्स फ्री, इझी टू ऑपरेट संकल्पनेत आखली जात आहेत. मूडलाइटच्या केलेल्या सोयीप्रमाणे दरवाजे खिडक्यांमधून पडदेही रिमोट ऑपरेट करण्याची सुविधा आपलं घर अद्ययावत करण्यासाठी सहज उपलब्ध होत आहे.

मुख्यत्वे पेंटिंगमधून दिसणारे ताजे टवटवीत रंग आता घरांच्या भिंतींवर निर्धास्तपणे स्थिरावू लागले आहेत. रंगांवरून आठवलं म्हणून एक आठवण सांगतो, लाल, पिवळ्या, निळ्या, या प्रायमरी रंगांचा वापर 'Le Carbusier' या जगद्विख्यात आर्किटेक्टने अहमदाबादच्या त्याच्या 'मिल ओनर असोसिएशन'च्या वास्तूबरोबर स्वतःच्या इतर अनेक रचनांतूनही बरेच वर्षांआधी अत्यंत परिणामकारकरित्या केला आहे. न्युट्रल कॉंक्रीटच्या पार्श्वभूमीवर रंगांचा योग्य प्रमाणात केलेला परिणामकारक वापर हा मॉडर्न आर्किटेक्चरमधील महत्त्वाचा ट्रेंड होता. रंगाच्या मुक्त वापराबरोबर घरातील पडदे, कुशन्स, सोफा कव्हरसाठी उत्तमोत्तम कापडांचा घातलेला मेळ घराचा पूर्ण चेहरामोहराच बदलून टाकत आहे. फर्निचरची वेगळी शैली, मुद्दाम ठराविक मटेरियलचा वापर, विशिष्ट रंगांची कॉम्बिनेशन्स अशी त्या त्या घराची वेगळी थीम त्यांच्या घरातल्यांच्या आवडीप्रमाणे दिसू लागलीय. हे वेगळेपण जपत असताना गृहसजावटीच्या आर्टिफॅक्ट्स मुद्दाम विशिष्ट ठिकाणांहून आणण्याची लोकांची तयारी आहे.

उपलब्ध प्रगत तंत्रज्ञान वापर करण्याचा ट्रेंड असताना दुसरीकडे 'आमच्या किचन आणि बेडरूम'ची जागा वास्तुशास्त्राला अनुसरून आहे ना? का त्यात बदल करूया? भिंतींचा रंग आमच्या राशीला फलदायी आहे ना? अशा अनेक शंकांचं पेव पसरत असताना फेंगशुई वास्तुशास्त्रानुसार इंटिरियर करण्याचा ट्रेंड अनेकांच्या मनाची पकड घेतोय.

आपल्या आवडीच्या थीमवर बेतलेल्या, आवडत्या कल्पनेतून साकारलेल्या, ट्रेंडी लुक आणण्यासाठी थोडे जास्त पैसे खर्चून सजवलेल्या या घरात राहायला मात्र आपल्या कामाच्या व्यस्त वेळापत्रकातून कितपत वेळ मिळतो हा एक वेगळाच प्रश्न आहे.

**(लेखक पुणेस्थित आर्किटेक्ट व इंटिरिअर डिझाइनर आहेत.)**

gadgilketan@indiatimes.com